गुरुपौर्णिमा
९ जुलै २०१६

॥ श्री ॥

॥ गुर्वष्टकम् ॥

शरीरं सुरूपं तथा वा कलत्रं
यशश्चारुचित्रं धनं मेरुतुल्यम्।
मनश्चेन्न लग्नं गुरोरंघ्रिपद्मे
ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ॥१॥

सुंदर देह नि सुरूप पत्नी
मोहक यश अन् अफाट धनही।
गुरुपदी मन ना जोवर जडले
कस्पट कस्पट तोवर सारे॥

आरोग्यसंपन्न, सुदृढ, देखणे व कमनीय शरीर मिळाले. सुंदर व सुडौल पत्नी लाभली. इच्छिल्यासारखे यश मिळाले. डोंगराएवढ्या धनाच्या राशी संपादन केल्या आणि मन जर श्री गुरुचरणाशी सुस्थिर नसेल तर या सगळ्याचा काय उपयोग? त्याने कितीसे सुख लाभेल? जन्म मरणाच्या फेऱ्यातून सुटका होईल का? पुढे काय? खरं म्हटलं तर भौतिक सुखाचीच अपेक्षा करणाऱ्यांना या सर्व गोष्टी लाभल्या म्हणजे आयुष्याची इतिकर्तव्यता वाटू शकते. मात्र या सगळ्याच गोष्टी काही काळपर्यंत सुख देऊ शकतात परंतु शाश्वत सुख नाही देऊ शकत! आज जरी सुरेख दिसणारे शरीर तर रोज बदलणारे आहे. बघता बघता ते वृद्ध होईल आणि कालांतराने मृत्यु त्याला गिळंकृत करेल. पत्नीचे सौंदर्य देखील फसवे आहे. ते कायम टिकणार नाही. गात्रे शिथिल होतील. कदाचित यशाला उतरती कळा लागेल. आज ज्या संपत्तीचा मला अभिमान आहे तो उद्या माझ्या

| FEBRUARY '14 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | | |
| M | T | W | T | F | S | S |

© www.madhaveeraghuveer.com

घरातून निघून जाईल. म्हणजेच त्या गोष्टी मिळवण्यासाठी मी खटाटोप केला त्या सर्वच नाशिवंत आहेत आणि शिवाय त्या चिरंतन सुख मिळवून देणाऱ्या नाहीत. मात्र श्रीगुरु प्रसन्न झाले तरच या जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होण्याची शक्यता आहे. मात्र भौतिक सुखांच्या नादात मी जर का गुरुचरणांना वंदन केले नाही तर हे सर्व व्यर्थच आहे. यांचा काही उपयोग नाही.

कलत्र धनं पुत्रपौत्रादि सर्वं
गृहं बान्धवाः सर्वमेताद्धि जातम्।
मनश्चेन्न लग्नं गुरोरांघ्रिपद्मे
ततः किं ततः किं ततः किं ततः किम्।।

पत्नी वैभव मुले नि बाळे
कुटुंब घर हे सर्व मिळाले।
गुरुपदी मन ना जोवर जडले
कस्पट कस्पट तोवर सारे ॥२१॥

मनाजोगती पत्नी मिळाली. सर्व प्रकारचे ऐश्वर्य सद्गुणी मुले, लळा लावणारी नातवंडे, भरपूर प्रशस्त असे घर, जीवाला जीव देणारे नातेवाईक हे सर्व मिळणे हे पुरेसे आहे का? तर नाही. जर मन सद्गुरुंच्या चरणकमळाशी जोडले गेले नसेल तर ह्या सर्वांचा काय उपयोग? या सर्वांची परिणति कशात होणार आहे? नक्की कोणते सुख मिळणार आहे? पुढे काय?

गृणाति ज्ञानं आणि गिरति अज्ञानम् अशी गुरु शब्दाची व्युत्पत्ति आहे.

DECEMBER '13

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

©www.madhaveeraghuveer.com

षडङ्गादिवेदो मुखे शास्त्रविद्या
कवित्वादि गद्यं सुपद्यं करोति।
मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे
ततः किं ततः किं ततः किं ततः किम्॥३॥

वेदांची सहा अंगे आहेत. शिक्षा, कल्प, व्याकरण, छंद, निरुक्त, ज्योतिष! तसेच षड् शास्त्रे म्हणजे योग, न्याय, सांख्य, वैशेषिक, पूर्वमीमांसा, उत्तर मीमांसा आहेत. या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी विलक्षण बुद्धिमत्ता व एकाग्रता आवश्यक आहे. परंतु ज्या विद्वान महात्म्याचे हे सर्वज्ञान अगदी मुखामध्ये असेल. अगदी जिभेवर सरस्वती असेल. किंवा गद्य पद्य रचनेसाठी शब्दांवर प्रभुत्व असेल. त्यासाठी लागणारी प्रतिभा सदैव जागृत असेल. या रचनांसाठी लागणारे कौशल्य अंगी असेल. अशा थोर महात्म्याला आपण निश्चितच ज्ञानी समजत असतो. परंतु हे सर्व असूनसुद्धा जर मन गुरुंच्या चरणकमलाशी सुस्थिर नसेल तर या सगळ्याचा उपयोग तरी काय? त्याने स्वरूपज्ञान होईल का? मोक्षाचा मार्ग सापडेल का? पुढे काय?

विदेशेषु मान्यः स्वदेशेषु धन्यः
सदाचारवृत्तेषु मत्तो न चान्यः।
मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे
ततः किं ततः किं ततः किं ततः किम्॥

व्यवसायातील कीर्ति दशदिशांना पसरली. परदेशात नाव लौकिक संपादन केला. स्वतःच्या देशात देखील धनः कीर्ति मिळाली मान मरातब संपादन केला.. इतकेच नाही तर सदाचरण आणि सद्वृत्ती

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| FEBRUARY '14 | | | | | 1 | | 2 |
| | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| | 24 | 25 | 26 | 27 | 28 | | |
| | M | T | W | T | F | S | S |

© www.madhavpeadhuveer.com

या सद्गुणांचा जरी विचार केला तरी याच्या तोडीचा कोणी आढळणार नाही. इतका ज्याचा लौकिक आहे. पण जर का मन सद्गुरूंच्या चरणाशी लीन झाले नसेल तर या सर्वांचा उपयोग तरी काय! त्याने कृतार्थता लाभेल का? सर्वज्ञता प्राप्त होईल का? अभेदत्व येईल का? पुढे काय?

क्षमामण्डले भूपभूपालवृन्दैः
सदा सेवितं यस्य पादारविन्दम्।
मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे
ततः किं ततः किं ततः किं ततः किम्॥५॥

क्षमा हे पृथ्वीचेच नाव आहे. सप्तसागरांनी वेढलेली ही मंडलाकार पृथ्वी आहे. या पृथ्वीवरील सर्व लहान मोठे राजे, महाराजे, सम्राट यांनी अत्यंत सन्मान देऊन अत्यंत नम्रतेने पादपूजा जरी केली तरी तेवढेच पुरेसे आहे का? त्याने काय होणार? जर मनाला गुरुचरणसेवेचा ध्यास लागला नाही तर शाश्वत पदाची प्राप्ती कधी होणार नाही आणि जर आत्मज्ञान होणार नसेल तर या सर्वांचा काय उपयोग? प्रगति नसेल तर पुढे काय?

यशो मे गतं दिक्षु दानप्रतापात्
जगद्वस्तु सर्वं करे यत्प्रसादात्।
मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे
ततः किं ततः किं ततः किं ततः किम्॥६॥

नोकरी, व्यवसाय उद्योग सामर्थ्य अमाप कीर्ति समजा मिळाली आणि यशाला अगदी दिशांचे बंधन उरले नाही. त्यात दानशूर वृत्तीमुळे भरपूर प्रसिद्धी मिळाली.

DECEMBER 13

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

© www.madhavaraghiveer.com

नावाला इतके वजन प्राप्त झाले की याच्या कृपेमुळे कोणालाही कोणतीही वस्तु हस्तगत करता येऊ शकते. अशक्य असे काही उरलेच नाही. असे जरी झाले तरी गुरुचरणकमलापाशी जर श्रद्धाभाव नसेल तर या सर्वांची किंमत शून्यच समजावी. कारण गुरुकृपेशिवाय सर्व व्यर्थच आहे.

न भोगे न योगे न वा वाजिराजौ
न कान्तामुखे नैव वित्तेषु चित्तम् ।
मनश्चेन्न लग्नं गुरोरंघ्रिपद्मे
ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ॥

अत्यंत संकुचित अशा कामनांपासून आता आचार्य आपल्याला व्यापकतेपर्यंत नेत आहेत. शरीरापासून सुरु झालेला हा प्रवास नंतर पत्नी, पैसा, यश कीर्ति पर्यंत पोहोचलो. त्यानंतर नातेवाईक, विद्याभ्यास, ज्ञान-विज्ञान, मान्यता, प्रसिद्धी, सत्कार, मान सन्मान, सिद्धी इथपर्यंत येऊन पोहोचलो. परंतु हे सर्व प्राप्त होऊनसुद्धा जर गुरुकृपा मिळाली नाही तर या भौतिक समृद्धीला काहीच अर्थ उरत नाही.

आता मात्र वाटचाल सूक्ष्माच्या दिशेने सुरु होते. एखादा कोणी खरोखर विरक्त झालेला कदाचित म्हणेल की मला आता कशाचाही मोह उरला नाही. माझे मन आता विलासी भोगातही रमत नाही किंवा धनयोग पुत्रयोग यांचीही अभिलाषा करत नाही. घोड्यांनी युक्त अशा रथांचीही मला अपेक्षा नाही. इतकेच नव्हे तर पत्नीच्या सुंदर मुखकमलाची वा भरपूर धनाची इच्छा करत नाही. हे सर्व खरे असले तरी असे चित्त गुरुचरणाशी जोडले गेले नाही तर काय उपयोग? वैराग्याला सुद्धा

FEBRUARY '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | | |

© www.madhaveeraghuveer.com

विवेकाची साथ हवी आणि त्यासाठी गुरुकृपा हवी. आणि दुसऱ्या अंगाने विचार केला तर जे नाशिवंतच आहे अनित्य आहे त्याविषयी असणाऱ्या वैराग्याची किंमत ती किती! असे वैराग्य क्षणिक असू शकते. ते टिकून रहाण्यासाठी विवेक हवा.

अरण्ये न वा स्वस्य गेहे न कार्ये
न देहे मनो वर्तते मे त्वनर्घ्ये।
मनश्चेन्न लग्नं गुरोरंघ्रिपद्मे
ततः किं ततः किं ततः किं ततः किम्॥८॥

आता त्यापुढची पायरी सांगितली आहे. आता अरण्यातही समाधान लाभत नाही वा घरातही मन रमत नाही. कोणत्याही कार्यात, सभासमारंभात आता रस वाटत नाही आणि माझ्या या अमूल्य शरीराविषयी आस्था उरली नाही. परंतु या सर्व गोष्टी असल्या तरी गुरुचरणांची ओढ लागली नाही तर या वैराग्याचाही काही उपयोग नाही. गुरुकृपेशिवाय कशालाच काही अर्थ नाही.

गुरोरष्टकं यः पठेत्पुण्यदेही
यतिर्भूपतिर्ब्रह्मचारी च गेही।
लभेत् वांछितार्थं पदं ब्रह्मसंज्ञं
गुरोरुक्तवाक्ये मनो यस्य लग्नम्॥९॥

जो महापुण्यवान संन्यासी, सम्राट, ब्रह्मचारी वा गृहस्थ या श्रीगुरु अष्टकाचे नित्य पठण करील व श्रीगुरुंच्या मुखातून आलेल्या वाक्याचे अखंड चिंतन करेल त्याला 'ब्रह्म' या अपेक्षित परमपुरुषार्थाची निश्चित प्राप्ती होईल.

DECEMBER '13

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |
| S | M | T | W | T | F | S |

© www.madhaveeraghuveer.com